महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४

क्र.कोविम/माध्य.गोप./ 1465
दिनांक : ०६.०८.२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
करवीर,पन्हाळा,कागल, हातकणंगले तालुके,
व कोल्हापूर शहर.

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०१९ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०१९ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणी/नियमन करण्याचे काम दिनांक १९.०७.२०१९ ते ०५.०८.२०१९ या कालावधीत डी.एड्.कॉलेज, पेटाळा, कोल्हापूर येथे करण्यात आले होते या कामी आपल्या शाळेतील काही शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असेल व त्यापैकी काही शिक्षकांनी रविवार दिनांक २१.०७.२०१९, दि. २८.०७.२०१९ व दि. ०४.०८.२०१९ रोजीच्या शासकीय सुट्टीच्या दिवशीही उत्तरपत्रिका तपासणीचे काम केले आहे.

मंडळाकडे काम केलेल्या शिक्षकांना त्याचे नेमणूक दिलेल्या विषयाचे काम संपल्यानंतर संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त आदेश देण्यात आलेले आहेत हे कार्यमुक्त आदेश पाहून वरील रविवारच्या सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या शिक्षकांना त्याचा कर्तव्य कालावधी समजून त्यांच्या मागणीनुसार त्यांना वर्षभर केव्हाही या सुट्टीच्या दिवशी काम केल्याबद्दल रजा/बदली सुट्टी देण्यात यावी.

उपरोक्त बाब ही जुलै २०१९ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणी व नियमन केलेल्या शिक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व या सर्व शिक्षकांचे मंडळातर्फे आभार व असेच सहकार्य यापुढील परीक्षेसाठी मिळावे ही अपेक्षा.

6/8

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.